# बालपण वाचवण्यासाठी

» कैलाश सत्यार्थी
samwad.mt@gmail.com

**भारतातील मुलांच्या समस्या जगाच्या चव्हाट्यावर आणण्यासाठी येत्या डिसेंबर महिन्यात नवी दिल्लीत भरणाऱ्या लॉरिएट्स अँड लीडर्स फॉर चिल्ड्रेन समीटच्या निमित्ताने...**

मी साधारण सहा वर्षांचा होतो त्यावेळी शाळेत जाताना मला एक चर्मकार मुलगा आपल्या वडिलांबरोबर काम करत बसलेला दिसला. त्यावेळी पहिल्यांदा प्रश्न पडला की माझ्याच वयाच्या त्या मुलाला माझ्यासारखं शाळेत जाता का येत नाही? तेव्हा मी अनेकांना हा प्रश्न विचारलाही. मात्र त्याच्या वडिलांसह अनेकांनी मला गरिबांच्या मुलांना काम करावंच लागतं, अशा प्रकारची उत्तरं देण्यात आली. तेव्हापासून माझ्या मनात या भेदभावाबद्दलची जाणीव निर्माण झाली. मग मी माझ्या पॉकिटमनीमधून पैसे वाचवून या मुलांसाठी काही ना काही करायला लागलो. मात्र एखाद्-दुसऱ्या मुलांची मदत करून ही समस्या सुटणार नव्हती हे जाणवलं. बालकामगार या समस्येची पाळंमुळं फार खोलवर गेली आहेत.

लहान मुलांकडून कामगार म्हणून काम करवून घेणे, त्यांना बालकामगार म्हणून वापरणे हा सर्वात भयंकर गुन्हा आहे. तरीही, 'चलता है' पद्धतीने त्यांच्याकडून काम करवून घेतलं जातं. लहान मुलांना स्वत:वर होणाऱ्या अन्यायाची जाणीव नसते. त्यांच्याकडून कितीही काम करून घेतलं तरी चालतं, अशी आपली मानसिकता होती. आजही ही मानसिकता बदललेली नाही. मेट्रो शहरांमध्ये मध्यमवर्गाचा आर्थिक स्तर जसा उंचावताना दिसतो, त्याच प्रमाणात ही समस्याही वाढलेली आहे. त्यांना घरकामासाठी न भांडणारी, न वाद घालणारी व्यक्ती हवी असते आणि लहान मुलांशिवाय त्यांची ही अपेक्षा कोण पूर्ण करू शकतं? लहान मुलांना पगारही कमी द्यायला लागतो. हॉटेलमध्ये काम करण्यासाठीही लहान मुलांना फसवून मुंबई, दिल्ली, हैदराबाद, बंगळुरूसारख्या मेट्रो शहरांमध्ये आणलं जातं. गेल्या काही काळात ईशान्येकडील राज्यांमधून मुलांना फसवून इतर शहरांमध्ये नेण्याचं प्रमाण वाढलं आहे. ओरिसा, झारखंड, बिहार, पश्चिम बंगाल, आसाम येथूनही या मुलांना आणलं जातं. आतापर्यंत मी आणि माझ्या सहकाऱ्यांनी ८५ हजारांहून अधिक मुलांची सुटका केली आहे. पहिल्यांदा जेव्हा मुलांची सुटका केली तेव्हा १९८१ साली आम्हाला मारामारी करावी लागली होती. आम्हालाही जबर मार बसला होता. आजही सुटकेसाठी प्रयत्न करताना मारामारी करावी लागते. ज्या मुलांची सुटका केली जाते त्यात खालच्या जातीतील मुलंच आढळून आली आहेत. वरच्या जातीतील मुलं या व्यवहारांमध्ये फारशी आढळून येत नाहीत.

मुलांची तस्करी करण्याच्या व्यवहारात प्रचंड पैसा मिळतो. त्यामुळे या कारभारावर नियंत्रण येत नाही. पोलिसही भ्रष्टाचार करतात. लहान मुलांच्या संरक्षणाच्या संदर्भातील आपल्याकडील कायदेसुद्धा पुरेसे कडक नाहीत. आज जगभरात १७ कोटी बालकामगार आहेत. भारतातील बालकामगारांचा विचार केला तर केंद्र सरकारच्या आकडेवारीनुसार देशात ४२ लाख तर सामाजिक संस्थांच्या आकडेवारीनुसार ही संख्या ३ कोटी आहे. सरकारी आकडेवारी प्रातिनिधिक सर्वेक्षणातून समोर आली आहे. त्यामुळे गैर सरकारी आकडेवारीवर जास्त विश्वास ठेवावा लागतो.

गेल्या काही काळात डिजिटल माध्यमांचा वापर वाढला आहे. त्यानुसार पोर्नोग्राफीसुद्धा मोठ्या प्रमाणात होत असल्याचं उघड होत आहे. आपल्या देशात लैंगिक शिक्षण दिलं जात नाही. कोणाकडून फसवले गेले आहोत, असं मुला-मुलींना उघडपणे आपल्या पालकांनाही सांगता येत नाही. अशा घटनांनंतर प्रश्न विचारणारे पोलिस, आरोग्य व्यवस्था, शाळा या ठिकाणी अशा घटना हाताळण्यासाठी योग्य यंत्रणा नाही. समुपदेशक नाहीत. या घटनांबद्दल प्रश्न कसे विचारायचे यासंदर्भात प्रशिक्षण देणं गरजेचे आहे. शाळेतील शिपाई, माळी यांनासुद्धा या प्रशिक्षणामध्ये सामील करून घ्यायला हवं.

पान ४ वर

